सामना

पुणे, शुक्रवार, दि. १० जुलै  २०२६

## 'माउली - एक कालातीत परंपरा' कार्यक्रमाचे रविवारी आयोजन

पुणे : फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे येत्या रविवारी (दि. १२) 'माउली - एक कालातीत परंपरा' या भरतनाट्यम् कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूडमधील मयूर कॉलनी येथील एमईएस सभागृहामध्ये सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय नृत्यांगणा, भरतनाट्यम् कलाकार कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर यांच्या नृत्याचा आविष्कार पाहण्याची संधी लाभणार आहे. सीएसआरच्या माध्यमातून मोफत शिक्षण देणाऱ्या फ्युएल शैक्षणिक संस्थेतील १० मुलींच्या शिक्षणाला साहाय्य करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती नृत्यांगणा कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर यांनी पत्रकार परिषदेत दिली. चंद्रशेखर म्हणाल्या, संतांच्या अभंगांच्या ओव्या एकसंघपणे जोडून संपूर्ण वारकरी सांप्रदायाचा प्रवास या कार्यक्रमाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे.